# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं २५/२०१८**

श्री. नामदेव सखाराम वारके } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. श्री.दुधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री<br>२. दुधसाखर महाविद्यालय बिद्री, ता.कागल, जि.कोल्हापूर } वि. प

**तक्रारीचे स्वरूप :**

श्री. दुधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री यांचे दुधसाखर महाविद्यालय बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर या महाविद्यालयातील शिपाई श्री. नामदेव सखाराम वारके यांनी दिनांक ३०/०७/२०१६ रोजी समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदरची तक्रार पुढीलप्रमाणे:—

दुधसाखर महाविद्यालयातील हेड क्लार्क श्री. महादेव कृष्णा भोईटे हे दि. ३१/०५/२०१५ रोजी निवृत्त झाल्यानंतर पदोन्नतीने निर्माण होणाऱ्या प्रशासकीय कर्मचारी वर्ग – ३ मधील 'प्रयोगशाळा सहाय्यक' या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार मला मिळणारी पदोन्नती डावलून श्री. शिवाजी नामदेव कांबळे या शिपाई पदावर काम करणाऱ्या, माझ्यापेक्षा सेवाकनिष्ठ कर्मचाऱ्यास पदोन्नती दिली आहे. शिपाई पदावरून ग्रंथालय/प्रयोगशाळा परिचर या पदावर पदोन्नती न देताच डायरेक्ट प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर जंपीग पदोन्नती दिली असून त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला आहे. ही बेकायदेशीर पदोन्नती रद्द व्हावी व सदर पदावर मला पदोन्नत करण्याबाबत आदेश व्हावेत ही विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्थेने त्यांची बाजू मांडणेकरिता पदोन्नतीबाबत खालील दोन पत्रे समितीसमोर सादर केली.

१. जा. क्र. विससं/उशि/कोवि/४३०२/२०१९ दि. २४/१०/२०१९
२. जा. क्र. एसडीएसपीएम/५६/२०१९–२० दि. १४/११/२०१९

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

संस्थेकडे तक्रारकर्त्याची तक्रार शिफारशीसह योग्य तो निर्णय होण्यासाठी पाठविली दि. २९/१०/२०१५ चे पत्र.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदाराने महाविद्यालयातील पदोन्नतीने निर्माण होणाऱ्या प्रशासकीय कर्मचारी वर्ग– ३ मधील प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर सेवाज्येष्ठतेनूसार मिळणारी पदोन्नती आपणासं डावलून श्री. शिवाजी नामदेव कांबळे या शिपाई पदावर काम करणाऱ्या, आपल्यापेक्षा सेवाकनिष्ठ कर्मचाऱ्यास पदोन्नती न देताच डायरेक्ट 'प्रयोगशाळा सहाय्यक' या पदावर जंपीग पदोन्नती दिली असून त्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे तसेच सदरची बेकायदेशीर पदोन्नती रद्द व्हावी व सदर पदावर आपणांस पदोन्नत करण्याबाबत आदेश व्हावेत, अशी समितीकडे लेखी विनंती केली आहे तसेच समितीसमोर प्रतिपादन केले आहे.

सदर तक्रारीबाबत तक्रारदाराने विभागीय सहसंचालक (उच्चशिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय सहसंचालक (उच्चशिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी महाविद्यालयाने पदोन्नती दिलेल्या श्री. शिवाजी नामदेव कांबळे यांची पदोन्नतीची वेतननिश्चीती रद्द केल्याचे जा.क्रं. शिसस/उशि/कोवि/अनु. १/२१५८/२०१९ दि. ३०/०५/२०१७ ने संबधित महाविद्यालयास कळविले होते. तथापी सदरच्या पत्रात संभ्रम निर्माण होत असल्यामुळे स्पष्टता होण्याकरिता संस्था व महाविद्यालयाने दि. २४/१०/२०१९ चे क. प्रशासन अधिकारी, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिलेले पत्र समितीसमोर सादर केले. सदरच्या पत्रात श्री. शिवाजी नामदेव कांबळे यांची पदोन्नतीची वेतननिश्चीती रद्द केल्याचे स्पष्ट होते.

तक्रारदाराने दाखल केलेल्या तक्रारीमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर सद्यस्थितीत महाविद्यालयाचे कर्मचारी श्री. कांबळे हे कार्यरत असल्याचे म्हटले आहे. तथापी संस्थेने जा.क्रं. एसडीएसपीएम/५६/२०१९–२० दिनांक १४/११/२०१९ चे पत्र समितीसमोर सादर केले. सदरच्या पत्रामध्ये संस्थेने श्री. कांबळे एस. एन. यांना दि. ०१/०६/२०१५ पासून प्रयोगशाळा सहाय्यक पदी पदोन्नती दिली आहे. त्याप्रमाणे ते प्रयोगशाळा सहाय्यक पदी काम करीत

आहेत. श्री. वारके एन. एस. यांच्या तक्रारीमुळे मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, कोल्हापूर यांनी पदोन्नतीची वेतननिश्चिती रद्द केली आहे. तरीही श्री. कांबळे एस. एन. शिपाई पदाचा पगार घेवून संस्थेच्या आदेशान्वये आणि विद्यार्थ्यांच्या हिताकरिता प्रयोगशाळा सहाय्यक पदाचे काम करीत आहेत असे नमूद केले आहे.

उपरोक्त कागदपत्रे समितीने अवलोकनी घेतले. तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीमध्ये नमूद प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी श्री. कांबळे यांची पदोन्नतीची वेतननिश्चीती रद्द केलेने पदोन्नतीने श्री. कांबळे यांना प्रयोगशाळा सहाय्यक हे पद दिलेचे दिसून येत नाही. तक्रारदाराची आपणास पदोन्नती देण्याबाबत आदेश व्हावेत, अशी मागणी असली तरीही पदोन्नती द्यावी किंवा कसे याबाबत इतर अनुषंगीक प्रशासकीय बाबी व पदोन्नतींचे नियम अवलोकनी घेऊन याबाबतची कार्यवाही संस्था/महाविद्यालयाचे अखत्यारीत येत असलेने समिती खालील निर्णयाप्रत येत आहे.

**आदेश**

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक :10 जानेवारी 2020

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
(श्री. ए. ए. कुलकर्णी)

सदस्य
(श्री. पी. डी. राऊत)

सदस्य
(श्री. व्ही. डी. नांदवडेकर)

सदस्य
(श्री.एन. बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)